सेन्सेक्स : ५८,७७३.८७ ▼ ८७२.२८ (-१.४६%) | निफ्टी : १७,४९०.७० ▼ २६७.७५ (-१.५१%) | डॉलर/₹ : ७९.८४ ▲ +०० पैसे | तेल / $ ९५.८० ▼ -०.८५ %

# नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी गुंतवणूक दिशादर्शनाचे आज विशेष सत्र

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** तापलेल्या महागाईच्या काळात खर्च व उत्पन्नाची तोंडमिळवणी करताना, कुटुंबासाठी पाहिलेल्या स्वप्नं अधुरी राहू नयेत. म्हणूनच अशा स्थितीत पैशाने पैसा वाढवत नेण्याचे अर्थात गुंतवणुकीचे मर्म प्रत्येकाने जाणून घेतलेच पाहिजे. याचेच मार्गदर्शन 'लोकसत्ता अर्थसल्ला' गुंतवणूकविषयक जागरातून केले जाणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी हे विशेष 'लोकसत्ता अर्थसल्ला' मार्गदर्शन सत्र मंगळवारी, २३ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आले आहे. आघाडीचे म्युच्युअल फंड घराणे असलेल्या आयसीआयसीआय प्रुडेन्शियल म्युच्युअल फंड प्रस्तुत हा कार्यक्रम महानगरपालिका मुख्यालयातील, ज्ञान केंद्र, तिसरा मजला येथे संपन्न होत आहे. वित्तीय नियोजनकार आणि स्तंभलेखक कौस्तुभ जोशी याप्रसंगी मार्गदर्शक वक्ते म्हणून उपस्थित असतील. तर नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती असेल.

महागाईला मात देणारा परतावा आणि कर बचत अशा दोन्ही अंगाने म्युच्युअल फंडातील गुंतवणूक महत्त्वपूर्ण आहे. महागाईचा चढता पारा, बरोबरीने व्याजदरातील वाढ याची गुंतवणुकीला असलेली जोखीम पाहता, गुंतवणुकीच्या सुरक्षित वाटा कोणत्या या संबंधाने कौस्तुभ जोशी हे या कार्यक्रमात मार्गदर्शन करतील. विशेषतः गुंतवणुकीच्या माध्यमातून मुलांचे उच्च-शिक्षण, लग्न, मोठे घर आणि गाडी ते निवृत्तीपश्चात निर्धास्त जीवनमान असे संपूर्ण जीवनाचे आर्थिक नियोजन साधण्याचे कानमंत्रही ते या निमित्ताने देतील. उपस्थितांना त्यांचे गुंतवणूकविषयक शंका आणि प्रश्न त्यांना थेट विचारण्याची संधी या निमित्ताने मिळेल.

मनात बाळगलेली स्वप्न आणि आर्थिक उमेद पूर्ण होण्याच्या दृष्टीने हे गुंतवणूकपर मार्गदर्शन सत्र मदतकारक ठरण्याबरोबरच नवीन आस जागविणारेही निश्चितच असेल.

गुंतवणूकदार प्रशिक्षण मोहीम
ICICI PRUDENTIAL MUTUAL FUND
प्रगती करा!
प्रस्तुत
लोकसत्ता अर्थसल्ला

- **कधी :** मंगळवार, २३ ऑगस्ट २०२२,
- **केव्हा :** दुपारी ३.०० वाजता
- **कुठे :** ज्ञान केंद्र, ३ रा मजला, नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय
- **वक्ते :** कौस्तुभ जोशी (वित्तीय नियोजनकार)
- **विषय :** गुंतवणुकीद्वारे अर्थ- नियोजन

म्युच्युअल फंड गुंतवणूक ही बाजारातील जोखमीच्या अधीन असते, योजनेसंबंधी सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

# 'सेन्सेक्स'ची पुन्हा आपटी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** अमेरिकी फेडरल रिझर्व्हसह जगभरातील मध्यवर्ती बँकांच्या व्याजदरात वाढीसंबंधी आक्रमक पवित्र्याचे सोमवारी भांडवली बाजारात भीतीदायी पडसाद उमटले. स्थानिक बाजारातही त्या परिणामी सेन्सेक्समध्ये जवळपास नऊ शतकी आपटी, तर निफ्टी निर्देशांक तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या १७,५०० च्या पातळीखाली बंद झाला.

सप्ताहाअखेरच्या एक टक्का घसरणीनंतर, सलग दुसऱ्या सत्रात निर्देशांक गडगडले. सुरुवातीपासून नकारात्मक कल राहिलेल्या बाजारात सोमवारचे बाजारातील व्यवहार आटोपले तेव्हा 'सेन्सेक्स' ८७२.२८ अंशांच्या तोट्यासह ५८,७७३.८७ वर बंद झाला. बरोबरीने निफ्टी निर्देशांक २६७.७५ अंश तुटीसह १७,४९०.७० वर दिवसअखेरीस स्थिरावला.

सलग दोन सत्रांतील तोट्यामुळे गुंतवणूकदारांचे तब्बल ६.५७ लाख कोटी रुपयांनी नुकसान झाले. ६० हजारांपुढे गेलेल्या सेन्सेक्सने विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी सातत्याने खरेदी करूनही दोन दिवसांत जवळपास १,७०० अंशांचे नुकसान सोसले आहे.

# यूपीआय व्यवहार नि:शुल्कच!

## सुविधा प्रदात्यांमध्ये मात्र दावे-प्रतिदाव्यांचा खेळ

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** रोकडरहित डिजिटल व्यवहारांमध्ये ग्राहकांकडून सर्वाधिक पसंती लाभलेल्या युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात 'यूपीआय'समर्थ व्यवहारांवर कोणतेही शुल्क आकारण्याचा सरकारचा विचार नसल्याचा अर्थमंत्रालयाने ट्विटद्वारे खुलासा केला आणि त्यावरून सोमवारी दावे-प्रतिदाव्यांचा खेळ रंगल्याचे चित्र दिसून आले.

स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित यूपीआयसमर्थ देयक व्यवहारांना प्रोत्साहन म्हणून सरकारने शून्य व्यापारी सवलत दर (एमडीआर) धोरण आखले आहे. त्यामुळे अन्य डिजिटल देयक व्यवहारांच्या विपरीत, यूपीआय आणि रुपे डेबिट कार्ड व्यवहार स्वीकारणाऱ्या व्यापाऱ्यांना कोणतेही शुल्क आकारले जात नाही. अर्थात या व्यवहारासाठी होणाऱ्या खर्चाची वसुली चिंताजनक आहे, पण त्याची व्यवस्था सुविधा प्रदात्यांना अन्य पद्धतींतून करता येईल, अशी पुस्तीही अर्थमंत्रालयाने जोडली आहे. त्यामुळे ही उपयुक्त सेवा विनामूल्यच राहील, या अर्थमंत्रालयाच्या स्पष्टीकरणाने सामान्यांना दिलासाच दिला आहे.

मात्र अर्थमंत्रालयाच्या खुलाशाला प्रतिसाद देताना, 'पेमेंट कौन्सिल ऑफ इंडिया'चे अध्यक्ष विश्वास पटेल यांनी दावा केला की, शून्य शुल्क रचनेच्या योजनेनुसार अर्थमंत्रालयाने दिलेले सर्व आर्थिक प्रोत्साहन फक्त बँकांकडूनच फस्त केले जात आहे. प्रत्यक्षात पेमेंट ॲग्रीगेटर किंवा सुविधा प्रदात्यांना काहीही मिळाले नाही. शिवाय कोणत्याही बँकेने यूपीआयसमर्थ व्यवहारांमध्ये जेमतेम एक अंकी वाढीचे योगदान दिलेले आहे, असे पटेल यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये म्हटले आहे.

यूपीआय व्यवहारांवर एमडीआर किंवा व्यापारी सवलत दर असावे, अशी पेमेंट उद्योगाच्या दीर्घकाळापासूनच्या मागणीनुसार पटेल यांनी ही तक्रार केली आहे. सरकारने त्याची दखल घेत डिसेंबर २०२१ मध्ये बँकांमार्फत पेमेंट गेटवे आणि यूपीआय व्यवहार मंचांना प्रोत्साहन म्हणून १,३०० कोटी रुपयांची योजना जाहीर केली. योजनेनुसार संपूर्ण प्रोत्साहनासाठी पात्र होण्यासाठी, बँकांनी रुपे डेबिट कार्डच्या संख्येत किमान १० टक्के वर्षागणिक वाढ आणि शेवटच्या तिमाहीच्या अखेरीस यूपीआय व्यवहारांमध्येही ५० टक्के वार्षिक वाढ दर्शवणे आवश्यक आहे.



तथापि, एकंदर डिजिटल व्यवहारात ६० टक्क्यांहून अधिक वाटा हा यूपीआयसमर्थ व्यवहारांचा आहे आणि दरमहा १० लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे व्यवहार या माध्यमातून सध्या होत आहेत. त्यात बँकांचा वाटा फारसा लक्षणीय नाही. तर पटेल यांनी केलेल्या दाव्याप्रमाणे, फोनपे, गूगलपे आणि पेटीएम पेमेंट बँक यासारख्या बँकेतर मंचाचा यूपीआय व्यवहारांच्या लोकप्रियतेत सर्वाधिक वाटा असल्याचे उपलब्ध आकडेवारीही दर्शविते. या तिघांकडून मिळून जवळपास ९५ टक्के व्यवहार सुकर केले जातात. एकट्या फोनपेचा मासिक व्यवहारांमध्ये ४६ टक्के बाजारहिस्सा आहे, त्यानंतर गूगलपेचा ३४ टक्के हिस्सा आहे.

शून्य शुल्काची रचना ही एकंदर या व्यवहार परिसंस्थेसाठी नुकसानकारक आहे आणि ज्यात परतावा नाही त्या सेवेसाठी आणखी गुंतवणूक करण्यास परावृत्त करणारी ही बाब ठरते, असाही पेमेंट कौन्सिल ऑफ इंडियाचा तक्रारवजा सूर राहिला आहे.

# 'सिटी सहकारी'च्या प्रश्नावर अर्थमंत्र्यांना साकडे

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** आर्थिक डबघाईला आलेल्या आणि रिझर्व्ह बँकेचे निर्बंध लागू असलेल्या मुंबईतील सिटी सहकारी बँकेच्या पुनरुज्जीवनाच्या प्रस्तावाचा ठेवीदारांचे व्यापक हित लक्षात घेता सहानुभूतीपूर्वक विचार केला जावा, असे आर्जव केंद्रीय अर्थमंत्री, रिझर्व्ह बँक आणि महाराष्ट्राच्या सहकार विभागाला पत्र लिहून करण्यात आले आहे.


वित्तीय क्षेत्रात कार्यरत धनवर्षा समूहाने सिटी सहकारी बँकेच्या पुनरुज्जीवनात स्वारस्य दाखविले आहे. तिचे स्मॉल फायनान्स बँकेत रूपांतरणाचा आणि त्यासाठी २३० कोटी रुपये भांडवलाच्या तरतुदीचा प्रस्तावही सादर करण्यात आला आहे. तथापि हा प्रस्ताव मार्गी लागण्यासाठी धनवर्षा समूहाने, सुधारित बँकिंग नियमन कायदा २०२० च्या तरतुदीनुसार बँकेवर लागू कलम ३५अ अन्वये निर्बंध उठवण्यासाठी आणि बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाच्या जागी प्रवर्तकांचे प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम (२७) (३) च्या तरतुदीत शिथिलतेची मागणी अर्थमंत्र्यांकडे केली आहे.

# कीर्ती उद्योग समूहाचे संस्थापक विष्णुदास भुतडा यांचे निधन

**लोकसत्ता वार्ताहर**

**लातूर :** कीर्ती उद्योग समूहाचे संस्थापक विष्णुदास भुतडा (वय ९२ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी सायंकाळी येथे निधन झाले.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत भुतडा यांनी कीर्ती उद्योग समूहाची उभारणी केली आणि उद्योग क्षेत्रात गगन भरारी घेतली. त्यांच्या पश्चात चार मुले सतीश, अशोक, कीर्ती, भारत आणि एक मुलगी मीना, सुना, जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे.



भुतडा यांच्या निधनाने उद्योग क्षेत्रातील दिग्गज काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी ११ वाजता मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.


## परभणी शहर महानगरपालिका, परभणी

दुरध्वनी क्र. (०२४५२) २२३८०९ फॅक्स (०२४५२) २२१४१५ इमेल : pcmcparbhani@gmail.com

जा.क्र. कावि/मनपा/ई-निविदा/श.अ/बांध/३३२/२०२२ **ई-निविदा सूचना** दिनांक १८/०८ /२०२२

कार्यालयीन ई-निविदा सुचना जा.क्र. कावि/मनपा/ई-निविदा/श.अ./बांध/३३३ /२०२२. **दि.१८/०८/२०२२** अन्वये मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजना **२०२१-२२** अंतर्गत विविध प्रभागातील **(४३ कामे)** सी.सी. नाली. व स्लाब, सी.सी. रोड, बी. टी. रोड बांधकाम, हायमास्ट बसविणे व इतर कामा करणे करीता ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत असुन सदर निविदा बाबतचा तपशील, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २२/०८/२०२२ पासून पहावयास उपलब्ध आहेत.

स्वाक्षरीत/-
शहर अभियंता
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

स्वाक्षरीत/-
उपायुक्त,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

## नगर परिषद कार्यालय, वाशीम

**ई-निविदा सूचना २०२२-२३ (Open Tender)**

मुख्याधिकारी नगर परिषद, वाशीम १५ वित्त आयोग अंतर्गत कामांची ई-निविदा टक्केवारी दराने दोन लिफाफा पद्धतीने मागवित आहेत. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने (On line) सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या विस्तृत नमुना व निविदा बाबत अटी-शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या असून त्याबाबतचे Tender ID पुढील प्रमाणे आहेत (१) 2022_DMA_828530_1 **(दुसरी वेळ)**
वरील संकेतस्थळावर पहावयास उपलब्ध आहेत.
प्रसिद्ध करणेत आलेल्या वेळापत्रका नुसार व ई-निविदा प्रपत्रातील अटी-शर्ती नुसार निविदाकारांनी कार्यवाही करावी.

स्वा/-
(दीपक मोरे)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाशीम

## जाहीर नोटीस

अशी **सुचना** देण्यात येते की, अमित एंटरप्रायझेस हाऊसिंग लिमिटेड यांनी माझ्या अशिलाला असे आश्वासन दिले आहे की, त्यांना खालील परिशिष्टामध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये (**"सदर मिळकत"**) निर्बंध व पणनयोग्य हक्क, अधिकार व हितसंबंध आहेत (सारस्वत बँक कर्ज बोजा व्यतिरिक्त) व त्यांनी सदर मिळकत माझ्या अशिलाला विकण्याचे मान्य व काबुल केलेले आहे.

जर कोणाही व्यक्ती / व्यक्तींस सदर मिळकत विकणे बाबत कोणत्याही स्वरुपाची हरकत अथवा आक्षेप असल्यास किंवा सदर मिळकत अथवा तिच्या कोणत्याही संबंधी विक्री, गहाण, लीज, लीन, परवाना, बक्षीस, वहिवाट, कुळ, बोजा, अदलाबदली, ताबा, अनुवांशिकता, वारसाहक्क, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था व इतर कोणत्याही प्रकारचा मालकीहक्क, हितसंबंध, मागणी, दावा, हुकूमनामा, न्यायनिर्णय, मनाई संबंधित व्यक्ती/ व्यक्तींनी मूळ कागदपत्रांसह खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीस सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१० (दहा) दिवसाच्या** दिवसांचे आत लेखी कळविणे आवश्यक आहे अन्यथा सदर मिळकत संदर्भात अशाप्रकारचा दावा / हक्क/ हरकत इत्यादी असल्यास त्यांनी तो संपुष्टात आणलेला आहे अथवा जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व त्यानंतर कोणाच्याही दावा/ हक्क / हरकतीची दाखल घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट**

डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी मुंबई ४०००१८ येथील नवीन सर्वे क्रमांक ३३४५, ३३४७, IA/०३३४५ आणि कॅडस्ट्रल सर्वे क्रमांक २ (पार्ट), ३ आणि १/३ वरळी डिव्हिजन येथे "शिवसागर इस्टेट" मधील भूखंड क्रमांक F यावरील बांधलेली **"सीजे हाऊस"** नावाच्या इमारती मधील ९ व्या मजल्यावरील "ऑफिस युनिट क्रमांक **९०२**" यासी चटई क्षेत्रफळ **२३५० चौरस फुट** व सादर इमारती मधील १ (एक) कार पार्किंगच्या जागेसह.

स्वाक्षरी/-
**श्री. शंतनू अ. पारुंडेकर**
ॲडव्होकेट
३, रचना रोझेट, प्लॉट क्रमांक १८,
शांतीशील सोसायटी, लॉ कॉलेज रास्ता,
एरंडवणे, पुणे ४११००४.
Mobile: 9890009198
Email: shantanu.parundekar@gmail.com
दिनांक: २३/०८/२०२२

## पश्चिम रेल्वे

**ई-टेंडर क्रमांक-TPI-1-2022 साठी शुद्धिपत्र**

दिनांक १४.०६.२०२२ रोजी भारतीय रेल्वे ई-प्रॉक्युअरमेंट सिस्टम (आयआरईपीएस) वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या निविदा क्रमांक WR-TPI-1-2022 संबंधात, अर्थात www.ireps.gov.in वर निविदा समाप्ती तारखेमध्ये सुधारणा करून हे बदल तात्काळ प्रभावाने जारी केले जाते.

| निविदा क्र. | समाप्ती तारीख | कामाचे वर्णन |
|---|---|---|
| WR-TPI-1-2022 | ०२.०९.२०२२ | भारतीय रेल्वेमध्ये वस्तूंच्या खरेदीसाठी तृतीय-पक्ष तपासणी एजन्सींची सहभागिता. |

कोणत्याही अधिक माहितीसाठी/स्पष्टीकरणासाठी कृपया संपर्क साधा : उपमुख्य साहित्य व्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, दूरध्वनी क्रमांक ९००४४९०७६५, ईमेल आयडी : **smm8@wr.railnet.gov.in**.

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

## THE MAHATMA GANDHI MEMORIAL HOSPITAL,

**DR. S. S. RAO ROAD, PAREL, MUMBAI-400 012**

**APPLICATIONS** are invited for the post of Junior Engineer (Electric) from retired officers on Contract Basis for MGM Hospital a Trust Hospital under ESI Scheme with 100% Grant-in-Aid.

| | |
|---|---|
| No. of posts | : 01 (One) |
| Age limit | : Upto 65 yrs can be relaxed upto 69 years depending upon qualification and experience. |
| Qualification | : Candidates should passed a Diploma/Degree in Electric Engineering from a Govt./Pvt. Recognized Poly Technical institute or from an Engineering College. |
| Experience | : 5 years in Practical experience in Electric Engineering work. |
| Nature of work | : All type of Electric works, to prepare estimates & monitoring electric works etc. |
| Salary | : As per G.R. dt. 17.12.2016 of General Admn. Department, Govt. of Maharashtra Only the retired Govt. servants will be considered. |

An application should be emailed to mgmhosparel@gmail.com within 10 days from the publication of this advertisement with full bio-data of the candidate along with relevant supportive documents. Medical Superintendent reserve power to cancelled this advertisement any time without citing any reason.

Sd/-
**MEDICAL SUPERINTENDENT.**

DGIPR-2022-23/5/2499

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**विद्युत विभाग**

निविदा सूचना क्रमांकः- ठा.म.पा./विद्युत/नि.सू./२५/२०२२-२३

ठाणे महानगरपालिका हद्दीतील धर्मवीर आनंद दिघे जिद्द विशेष शाळेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे व EPBAX सिस्टीम बसविणे, ठाणे महानगरपालिकेच्या मौलाना अबुल कलाम आझाद क्रीडाप्रेक्षागृह (कौसा स्टेडियम) येथील उच्च व लघुदाब विदयुत संच मांडणीची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे, ठाणे महानगर पालिकेच्या मुख्य प्रशासकिय भवनात तसेच सर्व प्रभाग समिती अंतर्गत कार्यालयात आवश्यकतेनुसार नवीन विंडो ए. सी, Split ए. सी. बसविणेचे कामी वार्षिक ठेका निश्चित करणे, ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय भवनात व महापालिकेच्या विविध कार्यालयात अत्यावश्यक विद्युत साहित्य पुरवीणे करीता वार्षिक ठेका निश्चित करणे व ठाणे महानगरपालिका मुख्य प्रशासकीय भवनात आवश्यकतेनुसार नविन विदयुतीकरण व नुतनीकरण करणेकामी ठेका निश्चित करणे अश्या पाच कामांकरिता निविदा ई टेंडरिग पध्दतीने दि. २३/०८/२०२२ ते दि.०६/०९/२०२२ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. निविदा ई टेंडरिडग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि. ०६/०९/२०२२ पर्यंत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व दि. ०७/०९/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येईल.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/४८६/२२-२३ **सही/-**
दि:२२.०८.२०२२ उपनगर अभियंता(विदयुत)
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*
**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या उथळसर प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.१२ (अ) नितिन कंपनी जंक्शन महापालिका भवन दरम्यान गटाराचे रुंदीकरण करणे कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर कामासाठी दि.२३.०८.२०२२ ते दि.०६.०९.२०२२ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेत स्थळावर दि.०६.०९.२०२२ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.०८.०९.२०२२ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/४८३/२२-२३ **सही/-**
दि:२२.०८.२०२२ नगर अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*
**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

## मिनोशा इंडिया लिमिटेड

**नोंदणी कार्यालय : युनिट नं. २०४, दुसरा मजला, टाऊन सेंटर - १, मित्तल इंडस्ट्रिअल इस्टेट जवळ, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००५९**
**कॉर्पोरेट कार्यालय : प्लॉट नं. २५, ओखला फेज-३, नवी दिल्ली - ११००२०**
**कॉर्पोरेट आयडेंन्टिटी नं.: यु७४९४०एमएच१९९३पीएलसी०७४६९४**
**टेलि. नं.: ०११-४२२६६२५०, ईमेल आयडी:** ril.info@minosha.in **युआरएल:** www.minosha.in

**सूचना**

**गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफ) मध्ये कंपनीचे समभाग हस्तांतरण करणे**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ **(कायदा)** च्या कलम १२४ च्या तरतुदी सहवाच्यता गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाच्या (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम २०१६ **(नियम)** सुधारित केल्यानुसार, न भरलेला लाभांश खात्यात हस्तांतरित केल्याच्या तारखेपासून ७ (सात) वर्षांच्या कालावधीसाठी न भरलेला किंवा दावा न केलेल्या सर्व लाभांश गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) मध्ये हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

भागधारकांना विनंती करण्यात येत आहे की कंपनीने २०१४-१५ या वित्तीय वर्षात घोषित केलेला लाभांश, जो ७ (सात) वर्षांच्या कालावधीसाठी न भरलेला / दावा न केलेला राहिला आहे, तो २३ ऑक्टोबर, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी, आयईपीएफ प्राधिकरणाच्या खात्यात हस्तांतरित केला जाईल. संबंधित समभाग ज्यांच्या संदर्भात सलग सात वर्षे लाभांश न भरलेला किंवा दावा न केलेला आहे, ते नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यात हस्तांतरित करणे आवश्यक आहे. ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित केले जाण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांचे तपशील कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच www.minosha.in वर उपलब्ध करून दिले आहेत.

ज्यांचे समभाग आयईपीएफ मध्ये हस्तांतरित केले जाण्यास पात्र आहेत अशा सर्व संबंधित भागधारकांना नियमांचे पालन करून, वैयक्तिक सूचना पाठवल्या जात आहेत.

कंपनीचा संबंधित भागधारक २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता १४ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत घोषित लाभांशाचा दावा करू शकतो, तसे न केल्यास, कंपनी, वरील नियमांचे पालन करून, वित्तीय वर्ष २०१४-१५ साठी न भरलेला/दावा न केलेला लाभांश आणि संबंधित समभाग हस्तांतरणाच्या देय तारखेला किंवा नंतर कोणत्याही पुढील सूचना न देता आयईपीएफ प्राधिकरणाने ठेवलेल्या खात्यात हस्तांतरित करेल.

न भरलेल्या / दावा न केलेल्या लाभांशाची रक्कम आणि आयईपीएफ मध्ये हस्तांतरित केलेल्या संबंधित समभाग आणि अशा समभागांवर जमा होणारे सर्व फायदे, जर असतील तर, या संदर्भात कंपनीविरूद्ध कोणताही दावा केला जाऊ शकत नाही, असल्यास, विहित नियमांमधील प्रक्रियेचे पालन करून ज्याचा तपशील आयईपीएफ प्राधिकरणाच्या www.iepf.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे त्यानुसार, फॉर्म क्रमांक आयईपीएफ - ५ हा अर्ज करून आयईपीएफ प्राधिकरणाकडे दावा केला जाऊ शकतो.

तुम्हाला या विषयावर काही शंका असतील किंवा कोणत्याही सहाय्याची आवश्यकता असल्यास, खालील पत्त्यावर कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट श्री. अजय दलाल, एमसीएस शेअर ट्रान्सफर एजंट लिमिटेड, एफ-६५, पहिला मजला, ओखला इंडस्ट्रिअल एरिया, फेज-१, नवी दिल्ली - ११००२०, टेलि. ०११-४१४०६१४९–५२; ईमेल admin@mcsregistrars.com किंवा पर्यायाने कंपनीचे सचिव यांच्याशी mil.secretarial@minosha.in यावर संपर्क साधा.

**मिनोशा इंडिया लिमिटेडकरिता,**
**ममता सुरकली**
**कंपनी सचिव**

**स्थळ** : नवी दिल्ली
**दिनांक** : २२ ऑगस्ट, २०२२

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**व्यवसाय विकास विभाग**
**ई-निविदा सूचना**
नं.:- बी.डी.डी./बी.डी.डी./१६०८ दिनांकित २२.०८.२०२२

मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका हे अनुभवी आणि नामांकित कंपन्यांकडून "Developing Visual Standardization of Brihanmumbai Municipal Corporation Identity Elements" विकसित करण्यासाठी ई-निविदा मागवतात. ''निविदा'' विभागांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवरून (https://portal.mcgm.gov.in) सदर निविदा प्रत डाऊनलोड केली जाऊ शकते.

सर्व इच्छुक वेंडर, मग ते आधीपासूनच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत असोत किंवा नसोत, त्यांना ई-निविदा प्रक्रियेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी करणे आणि ऑनलाइन निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी लॉगीन क्रेडेन्शियल्स मिळवणे बंधनकारक आहे. त्याचा तपशील वरील पोर्टलवर 'निविदा'अंतर्गत उपलब्ध आहे. नोंदणी, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रे आणि वापरकर्ता पुस्तिका यासाठी कृपया 'निविदा' टॅबमध्ये प्रदान केलेल्या संबंधित दुव्यांचा संदर्भ घ्यावा.

सेफस्क्रिप्ट, आयडीआरबीटी, नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर, टीसीएस, कस्टम्स, एमटीएनएल जीएनएफसी आणि ई-मुद्रा या प्रमाणित प्राधिकरणांच्या नियंत्रकांनी परवाना दिलेल्या प्रमाणित प्राधिकरणांपैकी कोणत्याही एकाकडून (सीए) वेंडर डिजिटल स्वाक्षरी मिळवू शकतात. या संदर्भात वेंडरला मदत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मध्यवर्ती खरेदी खाते या कार्यालयात हेल्प-डेस्कदेखील उघडले आहे.

तांत्रिक आणि व्यावसायिक निविदा खाली नमूद केलेल्या अंतिम तारखेपर्यंत आणि वेळेपर्यंत ऑनलाइन सादर केल्या जातील :-

| अ. क्र. | वर्णन | ई-निविदा शुल्क | ईएमडी (अर्नेस्ट मनी डिपॉझिट) रु. | निविदा दस्तऐवज खरेदी सुरू करण्याची तारीख आणि वेळ | निविदा दस्तऐवज जमा करण्याची शेवटची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Developing Visual Standardization of Brihanmumbai Municipal Corporation Identity Elements | रु. ११००/- अधिक १८ टक्के एसजीएसटी | रु. १०,०००/- | २३.०८.२०२२ स. ११.०० वा. | ०१.०९.२०२२ दु. ०४.०० वा. |

**टीप : अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) च्या ऑनलाइन पेमेंटची शेवटची तारीख विहित तारीख आणि वेळ निर्धारित केलेल्या तारखेवर किंवा त्यापूर्वी आहे.**

या निविदा सूचनेसह महापालिकेच्या पोर्टलवर (https://portal.mcgm.gov.in) निविदा दस्तऐवज उपलब्ध आहे. तथापि, निविदाकाराला एसआरएम मॉड्यूलमध्ये दस्तऐवज डाऊनलोड आणि अपलोड करण्यापूर्वी ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे ''ई-निविदा किंमत'' द्यावी लागेल. निविदाधारकांना अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी)ची रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरायची आहे.

**टीप :-** बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे स्थायी ठेव असलेल्या निविदाधारकांना कोणतीही सूट दिली जाणार नाही. निविदाधारकांना निविदा ईएमडीची रक्कम भरावी लागेल.

सदर प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका) वरीलपैकी कोणत्याही बाबतीत किंवा निविदा किंवा बिड प्रक्रियेशी संबंधित किंवा या संबंधित कोणत्याही बाबीमुळे उद्भवणाऱ्या बाबी किंवा गोष्टीमुळे, त्यातील कोणतीही त्रुटी किंवा चूक किंवा प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही माहिती किंवा डेटामध्ये असल्यास कोणत्याही त्रुटी, चूक किंवा त्रुटीसाठी जबाबदार राहणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतात.

या निविदा सूचनांसंदर्भात जारी केलेले कोणतेही परिशिष्ट/शुद्धिपत्रक केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवर प्रकाशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

पीआरओ/११४३/एडीव्ही/२०२२-२३

**कुठेही पाणी साचू देऊ नका, डासांना निमंत्रण देऊ नका.**

सही/-
**प्रमुख व्यवसाय विकास**

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

**ई-निविदा क्र. 01**

Main Portal : https://mahatenders.gov.in
MHADA Portal : https://mhada.maharashtra.etenders.in
MHADA Website : http://www.mhada.maharashtra.gov.in

कार्यकारी अभियंता/ प्रनिस विभाग/ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, गृहनिर्माण भवन, २रा मजला, खोली क्र. ३१८, कलानगर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१. या कार्यालयातर्फे स्टेशनरी वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणारे अधिकृत स्टेशनरी पुरवठा करत असणाऱ्या पुरवठाधारकाकडून नमुना-डी [बाबवार दरावर] मध्ये वार्षिक पुरवठ्याच्या कंत्राटाकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

ई-निविदा वरील संकेतस्थळावर दिनांक २२.०८.२०२२ [सायंकाळी ५.३५ वाजेपासून] दिनांक ०१.०९.२०२२ [सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत] उपलब्ध आहेत.

जे ठेकेदार पहिल्यांदा ई-निविदा प्रक्रियेत भाग घेत आहेत, त्यांना संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रथम डिजीटल युजर आय.डी. व पासवर्ड प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ई-निविदासंबंधी काही सहाय्यता आवश्यक असल्यास डाऊनलोड/ अपलोड इत्यादीसाठी दूरध्वनी क्र. १८००३०७०२२३२ वर अथवा eproc.support@mahatenders.gov.in वर संपर्क साधावा.

ई-निविदा प्रक्रिया कामासंदर्भात वरील सर्व माहिती वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**
**CPRO/A/496**

सही/-
कार्यकारी अभियंता
प्रनिस विभाग/ मुंबई मंडळ